सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८

# मुंबईचा शिधावाटपाच्या (शिधावाटपाची पूर्वतयारी करणे व ते चालू ठेवणे याबाबतच्या) उपायांबाबत अधिनियम, १९४७

(दिनांक १५ नोव्हेंबर, २०१२ पर्यंत सुधारित)

**BOMBAY ACT No. LVIII OF 1947**

# THE BOMBAY RATIONING (PREPARATORY AND CONTINUANCE) MEASURES ACT, 1947

**(As modified upto the 15th Nov., 2012)**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२०१३

[ किंमत : १०.०० रुपये ]

## मुंबईचा शिधावाटपाच्या (शिधावाटपाची पूर्वतयारी करणे व ते चालू ठेवणे याबाबतच्या) उपायांबाबत अधिनियम, १९४७.

### अनुक्रमणिका

**उद्देशिका.**


| **कलमे.** | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | १ |
| २. | व्याख्या. | १ |
| ३. | जागांना क्रमांक देणे आणि व्यक्तींबाबतची माहिती गोळा करणे याबाबत अधिकार. | ३ |
| ४. | विवक्षित प्रश्नांचे उत्तर देणे आणि विवक्षित माहिती सादर करणे यासंबंधात बंधन. | ३ |
| ५. | प्रवेश करण्याचा अधिकार. | ३ |
| ६. | भारतीय संरक्षण नियमावली अन्वये रंगवून अक्षरे, चिन्हे व क्रमांक, लिहिणे इत्यादी आणि आदेश देणे हे या अधिनियमान्वये रंगविण्यात आले असल्याचे, इत्यादी मानण्यात यावे. | ४ |
| ७. | शास्ती. | ४ |
| ८. | कामकाजास प्रतिबंध | ५ |
| ९. | खटला मंजूर करणे. | ५ |
| १०. | निरसन. | ५ |

## १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८[१]

# [मुंबईचा शिधावाटपाच्या (शिधावाटपाची पूर्व तयारी करणे व ते चालू ठेवणे याबाबतच्या) उपायांबाबत अधिनियम, १९४७]

(या अधिनियमाला गव्हर्नर जनरल यांची अनुमती मिळाल्यानंतर प्रथम मुंबई शासन राजपत्रात दिनांक १९ जानेवारी, १९४८ रोजी प्रसिद्ध करण्यात आला.)

विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे सुधारणा व फेरबदल करण्यात आले.

मुंबई विधि अनुकूलन आदेश (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ याद्वारे सुधारणा व फेरबदल करण्यात आले.

महाराष्ट्र विधि अनुकूलन आदेश (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याद्वारे अनुकूलन व फेरबदल करण्यात आले.

समाजाचे जीवनावश्यक जिन्नस व वस्तू यांचे शिधावाटपाचे कामकाज चालू ठेवण्याकरिता यासंबंधातील उपाय म्हणून जागांना क्रमांक देणे आणि व्यक्ती व आस्थापना याबाबतची माहिती गोळा करणे यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

**ज्याअर्थी,** समाजाचे जीवनावश्यक जिन्नस व वस्तू यांचे शिधावाटपाचे कामकाज चालू ठेवण्याकरिता यासंबंधातील उपाय म्हणून जागांना क्रमांक देणे आणि व्यक्ती व आस्थापना याबाबतची माहिती गोळा करणे यांची तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** याद्वारे खालीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :--

**संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमास मुंबईचा शिधावाटपाच्या (शिधावाटपाची पूर्वतयारी करणे व ते चालू ठेवणे याबाबतच्या) उपायांबाबत अधिनियम, १९४७ असे म्हणावे.

(२) हा अधिनियम संपूर्ण [२][महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रास] लागू आहे.

(३) [३][राज्य] शासनास राजपत्रामधील अधिसूचनेद्वारे असे निदेश देता येतील की, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे कोणत्याही क्षेत्रामध्ये तो अंमलात येईल.

**व्याख्या.**

**२.** या अधिनियमात विषय किंवा संदर्भ यामध्ये काही विरुद्ध नसेल तर

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, मुंबई शासन राजपत्र, १९४७, भाग पाच, इं. पृ. २३६; विधानसभेतील कामकाजाकरिता, मुंबई विधानसभा वादविवाद, १९४७, खंड अकरा; आणि विधान परिषदेतील कामकाजाकरिता, मुंबई विधान परिषद वादविवाद, १९४७, खंड तेरा पहा.

[२] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याद्वारे "राज्यक्षेत्राचे हस्तांतरण वगळून मुंबई राज्याची पूर्व पुनर्रचना" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतिक' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(१) "आस्थापना" याचा अर्थ, खाद्यपेयव्यवस्था आस्थापना, संस्था, निवासी आस्थापना, वस्त्रनिर्माण आस्थापना, गिरण्या, उद्योग, प्राणी आस्थापना आणि ज्या आस्थापनाला [१][राज्य] शासन किंवा प्राधिकृत अधिकारी हे याद्वारे त्यांच्यावतीने या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ आस्थापना असे घोषित करतील अशी कोणतीही इतर आस्थापना किंवा आस्थापनाचे प्रकार, असा आहे.

(२) (एक) "खाद्यपेयव्यवस्था आस्थापना" यामध्ये हॉटेल, उपाहारगृहे, खाद्यगृहे, कॅफे, चहाची दुकाने, कॉफी विक्री केंद्रे, मोफत खाद्य केंद्रे आणि जनता, क्लब, आहारगृहे यांकरिता खुली असलेली अल्पोपहार यांची प्रत्येकी इतर ठिकाणे आणि इतर तशाच आस्थापना यांचा समावेश होतो.

(दोन) "संस्था" यामध्ये रुग्णालये, आरोग्यधाम, पुनरारोग्य प्रापक गृहे, शुश्रूषा गृहे, अनाथालय कार्यगृहे, अपंगालये, उपचार गृहे, निवासी शाळा (दिवसा भोजन घेणारे) आणि इतर तशाच आस्थापना यांचा समावेश होतो.

(तीन) "निवासी आस्थापना" यामध्ये खाजगी कुटुंबांचा समावेश असणार नाही. परंतु खानावळ, दालनगृहे निवासी हॉटेल, हॉटेल, परिचारिका गृहे, निवासी शाळा (कधीच भोजन न घेणारे) आणि इतर तशाच आस्थापना यांचा समावेश होतो.

(चार) "वस्तुनिर्माण आस्थापना" यामध्ये बेकरी, मिठाई आणि इतर तशाच आस्थापना यांचा समावेश होतो.

(पाच) "गिरण्या" यामध्ये पिठाच्या गिरण्या, अन्नधान्याच्या गिरण्या आणि इतर तशाच आस्थापना यांचा समावेश होतो.

(सहा) "उद्योग" याचा अर्थ, कोणत्याही वस्तूचे उत्पादन, वस्तुनिर्मिती, वस्तू तयार करणे याप्रक्रियेबाबत [१][राज्य] शासनाने राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्यांच्यावतीने कोणत्याही विनिर्दिष्ट वस्तूच्या वापराबाबत आवश्यक असलेला उपक्रम असा आहे.

(सात) "प्राणी आस्थापना" यामध्ये घोडे किंवा पशू यांच्याकरिता असलेले तबेले, कुक्कुटपैदास क्षेत्र, प्राणिसंग्रहालय, पशुसंग्रह, पशुवैद्यकीय रुग्णालये, पांजरपोळ, आणि इतर तशाच आस्थापना यांचा समावेश होतो.

(३) "चौकशी अधिकारी" याचा अर्थ, कलम ३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ब) अन्वये प्राधिकृत व्यक्ती आणि कलम ३ च्या पोट-कलम (२) अन्वये त्याला साहाय्य करण्यासाठी नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे;

(४) "गणना अधिकारी" याचा अर्थ, कलम ३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (अ) अन्वये प्राधिकृत व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये कलम ३ च्या पोट-कलम (२) अन्वये त्याला साहाय्य करण्यासाठी नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती याचा समावेश होतो.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**३.** (१) जर [1][राज्य] शासनाच्या मते, समाजाचे जीवनावश्यक असलेले कोणतेही जिन्नस किंवा वस्तू यांच्या शिधावाटपाची पूर्वतयारी करणे व ते चालू ठेवण्यासाठी म्हणून खालील उपाय पार पाडणे आवश्यक आहे किंवा इष्ट आहे, असे असेल तर [1][राज्य] शासनास— **जागांना क्रमांक देणे आणि व्यक्तींबाबतची माहिती गोळा करणे याबाबत अधिकार.**

(क) कोणतीही जागा किंवा दुकान यांची ओळख सुलभ होण्यासाठी आवश्यक असेल त्याप्रमाणे त्या जागांना अक्षर, चिन्ह, क्रमांक देण्यासाठी कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत त्या क्षेत्रातील कोणत्याही व्यक्तीला प्राधिकार देता येतील;

(ख) त्या क्षेत्रामधील ओळख किंवा शिधावाटपाचे कामकाज चालू ठेवण्यासाठी आवश्यक माहिती व आकडेवारी गोळा करणे आणि त्याची पडताळणी किंवा पुन्हा पडताळणी करण्याकरिता कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत कोणत्याही व्यक्तीला प्राधिकार देता येतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस उपाय पार पाडण्यासाठी इतर व्यक्ती किंवा सहाय्य करणारी व्यक्ती यांची लेखी आदेशाद्वारे नियुक्ती करता येईल.

**४.** (१) चौकशी अधिकाऱ्यास कलम ३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे या प्रयोजनासाठी [1][राज्य] शासनाने **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केल्याप्रमाणे असा प्रश्न कोणत्याही व्यक्तीला विचारता येईल. **विवक्षित प्रश्नाचे उत्तर देणे आणि विवक्षित माहिती सादर करणे यासंबंधात बंधन.**

(२) चौकशी अधिकाऱ्यास [1][राज्य] शासनाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अशा स्वरूपात उक्त आस्थापनाच्या संबंधात त्यांना माहिती पुरविण्यासाठी स्वतः किंवा आस्थापनेचा प्रभारी अधिकारी म्हणून कोणत्याही व्यक्तीचा आदेश उक्त प्रयोजनासाठी काढता येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये प्रश्न विचारलेल्या प्रत्येक व्यक्तीला किंवा पोट-कलम (२) अन्वये कोणतीही माहिती सादर करण्याचा आदेश दिलेल्या प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या संपूर्ण माहितीप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे या प्रश्नाचे उत्तर देणे किंवा माहिती सादर करणे कायद्याने बंधनकारक करण्यात येईल आणि तसे करण्याचे चौकशी अधिकाऱ्याने फर्मावले तर तो त्याचे नाव लिहिल व त्याखाली आपली स्वाक्षरी करील.

**५.** कोणत्याही जागेचा ताबा असणारी प्रत्येक व्यक्ती, गणना अधिकारी किंवा चौकशी अधिकारी यास त्याच्या कामाच्या प्रयोजनासाठी त्या व्यक्तीच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही जागेत प्रवेश करणे आवश्यक वाटले तर तसा प्रवेश करण्यासाठी परवानगी देईल. **प्रवेश करण्याचा अधिकार.**

परंतु असे की, अशा जागेत प्रवेश करताना अशा अधिकाऱ्याने ताबाधारकाच्या सामाजिक व धार्मिक रूढीचा आदरभाव राखला पाहिजे.

---

[1]. विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**भारतीय संरक्षण नियमावली अन्वये रंगवून अक्षरे, चिन्हे व क्रमांक लिहिणे इ. आणि आदेश देणे हे या अधिनियमान्वये रंगविण्यात आले असल्याचे, इत्यादी मानण्यात यावे.**

**६.** भारतीय संरक्षण नियमावली अन्वये प्राधिकरणाद्वारे काही आदेश देण्यात आले आहेत त्या आदेशान्वये कोणत्याही जागेवर रंगवून वा पुन्हा रंगवून लिहिणे, चिन्हे लावणे व क्रमांक टाकणे किंवा ते चिकटवणे हे सर्व या अधिनियमान्वये अशा जागेवर रंगवून वा पुन्हा रंगवून किंवा चिकटवून वा पुन्हा चिकटवून करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

**शास्ती.**

**७.** (अ) ज्या कोणत्याही चौकशी अधिकाऱ्याने त्याच्याकडून कोणतीही चौकशी होत असताना त्या चौकशीच्या संबंधात जाणूनबुजून चुकीची माहिती लिहिली तर; किंवा

(ब) गणना अधिकारी किंवा चौकशी अधिकारी हे असे अधिकारी म्हणून त्यांच्या अधिकारांचा वापर करताना किंवा त्यांचे कर्तव्य पार पाडताना जी कोणतीही व्यक्ती स्वेच्छेने अडथळा आणत असेल तर; किंवा

(क) कलम ४ अन्वये कोणत्याही प्रश्नांचे उत्तर देण्यासाठी किंवा कोणतीही माहिती सादर करण्यासाठी कलम ४ अन्वये कायद्याने बांधील असलेल्या व्यक्तीने—

(एक) एखाद्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी किंवा त्याच्या संपूर्ण माहितीप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे माहिती सादर करण्यास नकार दिला असेल तर; किंवा

(दोन) चुकीचे उत्तर दिले असेल तर किंवा चुकीची आणि एकतर चुकीची असल्याचे माहीत असेल अथवा चुकीची असल्याचा विश्वास असेल किंवा खरी असल्याचा विश्वास नसेल अशी माहिती दिली असेल तर;

(ड) कोणत्याही जागेचा ताबा असलेल्या कोणत्याही व्यक्तीने कलम ५ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे गणना अधिकारी किंवा चौकशी अधिकारी यांना त्या जागेत प्रवेश करण्याची परवानगी देण्यास नकार दिला असेल तर; किंवा

(ई) या अधिनियमाअन्वये कोणत्याही जागेत रंगविण्यास वा पुन्हा रंगविण्यात आलेली किंवा चिकटवलेली वा पुन्हा चिकटविण्यात आलेली किंवा रंगविण्यात आल्याचे वा पुन्हा रंगविण्यात आल्याचे किंवा चिकटविण्यात आल्याचे वा पुन्हा चिकटविण्यात आल्याचे मानण्यात आलेली अक्षरे, खुणा किंवा

क्रमांक ज्या कोणत्याही असतील, बदलले असतील किंवा खराब केले असतील तर ; त्या व्यक्तीस अपराध सिद्धीनंतर सहा महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची शिक्षा होईल आणि ती व्यक्ती पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या रकमेच्या दंडासही पात्र असेल.

**८.** या अधिनियमाच्या अनुषंगाने सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही. **कामकाजास प्रतिबंध**

**९.** [1][राज्य] शासनाच्या किंवा [1][राज्य] शासन याबाबतीत प्राधिकृत करील अशा अधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीशिवाय या अधिनियमाअन्वये कोणताही खटला दाखल करता येणार नाही. **खटला मंजूर करणे.**

**निरसन.** **१०.** मुंबईचा शिधावाटपाची पूर्वतयारी करणे उपायांबाबत अधिनियम, १९४३ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. **१९४३ चा मुंबई १.**

परंतु असे की,—

(एक) निरसित अधिनियमान्वये मान्यता मिळालेला आणि हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी तात्काळ अंमलात आलेला प्रत्येक प्राधिकार या अधिनियमाअन्वये मान्य केला असल्याचे मानण्यात येईल; आणि

(दोन) निरसित अधिनियमान्वये कोणत्याही जागेवर रंगविण्यात आलेली वा पुन्हा रंगविण्यात आलेली किंवा चिकटविण्यात आलेली वा पुन्हा चिकटविण्यात आलेली अक्षरे, खुणा, आणि क्रमांक हे या अधिनियमान्वये कोणत्याही जागेवर रंगविण्यात आल्याचे वा पुन्हा रंगविण्यात आल्याचे किंवा चिकटविण्यात आल्याचे वा पुन्हा चिकटविण्यात आल्याचे मानण्यात येईल.

---

[1] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य,
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४
  दूरध्वनी : २३६३२६९३ २३६३०६९५

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार,
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक.
  पुणे-४११ ००१.
  दूरध्वनी : २६१२५८०८ २६१२४७५९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१.
  दूरध्वनी : २५६२६१५ २५६२६१५

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार, ग्रंथागार
  पैठण रोड, रेल्वे स्टेशनजवळ.
  औरंगाबाद-४३१ ००१
  दूरध्वनी : २३३१४६८ २३३१५४५

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क,
  कोल्हापूर-४१६ ००३.
  दूरध्वनी : २६५०३९५ २६५०४०२

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते